# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

**२०२३**

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** दिनांक ०३.०४.२०२३

**१९ वर्षाच्या तरुणाचा क्रूरपणे धारधार हत्याराने वार करून खून केलेल्या क्लीष्ट/गंभीर गुन्हयाची कक्ष-०३, गुन्हे शाखेने ४८ तासात उकल करुन तीन मारेक-यांना जेरबंद केले.**

---

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामधील शिवकर गाव, ता. पनवेल, जि. रायगड येथील राहणारा विनय विनोद पाटील वय १९ वर्षे याचा अज्ञात इसमाने दिनांक २९/०३/२०२३ रोजीचे पहाटे ०२.१० ते ०४.०० वा. चे दरम्यान अज्ञात कारणावरुन धारधार हत्यारांनी शरीरावर अत्यंत क्रूरपणे वार करुन खून केला होता. सदर घटनेच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्रं. २१५/२०२३, भा.द.वि.सं.कलम ३०२ अन्वये अज्ञात इसमांविरुध्द खुनाचा गुन्हा दाखल झालेला होता.

सदर घटनेची माहिती प्राप्त झालेनंतर कक्ष-०३, गुन्हे शाखेकडून तात्काळ घटनास्थळी भेट देवून मा. वरीष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयातील अज्ञात आरोपींचा शोध घेणेबाबत समांतर तपास सुरु करण्यात आला होता. तरुणाच्या हत्येमुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण होवून हळहळ व्यक्त करण्यात येत होती. कक्ष ३ चे तपास पथकाने फिर्यादी व साक्षीदार, घटनास्थळ परिसरामध्ये मिळून आलेल्या संशयित वस्तू, सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास, गोपनिय बातमीदार यांचे सहाय्याने आरोपींची माहिती मिळविण्याचे प्रयत्न सुरु केले होते. मयताचे हत्येचे कारण तसेच आरोपींबाबत कोणतीही उपयुक्त माहिती मिळून येत नसल्याने कक्ष-०३ चे तपास पथकाने वारंवार घटनास्थळ परिसर पिंजून काढून परिसरातील येण्या-जाण्याचे मार्ग व पाऊलवाटांची माहिती घेवून, स्थानिक रहिवासी यांचेकडे माहिती घेवून तांत्रिक तपासाच्या व गोपनीय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे अत्यंत कौशल्यपुर्ण व सखोल पद्धतीने विचारपूस तंत्राचा परिपुर्ण वापर करुन संशयित इसमांचा तपास सुरु होता. दिनांक ३१/०३/२०२३ रोजी कक्ष-३ च्या तपास पथकाने उसर्ली गाव, ता. पनवेल, जि. रायगड येथुन तीन संशयितांना शिताफीने ताब्यात घेवून त्यांचेकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे दिसून आलेले आहे. नमुद आरोपीत हे शिवकर गावामध्ये चोरी करण्यासाठी आलेले होते त्यावेळी त्यांनी काही रहिवाशांच्या घराला बाहेरून कडी लावलेली होती. त्यानंतर त्यांनी फिर्यादी व मयत यांचे घरातुन मोबाईल व इतर साहित्य चोरी करून जात असताना मयत याला नमुद आरोपीत चोरी करून जात असल्याचे जाणवले असता त्याने त्यांचा पाठलाग करून करीत असताना आरोपींनी त्याला चाकु व कु-हाडीने गंभीर दुखापती करत मुंबई पुणे एक्सप्रेसवे ब्रिजचे खाली रोडलगत झुडपामध्ये ओढत नेवुन जिवे ठार मारुन टाकले असले बाबत प्राथमिक तपासामध्ये दिसुन आलेले आहे.

आरोपींची नावे -

१) दिनेशकुमार भैय्यालाल सरोज वय १९ वर्षे, सध्या रा. समर्थ इंटरप्रायझेस, उसर्ली गाव, ता. पनवेल, जि. रायगड, मुळ रा. मोईनुद्दीनपूर, जि. कौसंबी, राज्य - उत्तर प्रदेश

२) वीरेंद्रकुमार रामदुलारे सरोज वय २१ वर्षे, सध्या रा. समर्थ इंटरप्रायझेस, उसर्ली गाव, ता. पनवेल, जि. रायगड, मुळ रा. जवाई, पो. सराय आखीत, थाना - मंझनपूर, जि. कौसंबी, राज्य उत्तरप्रदेश

३) चंद्रशेखरकुमार लालजी वय २२ वर्षे, रा. समर्थ इंटरप्रायझेस, उसर्ली गाव, ता. पनवेल, जि. रायगड, मुळ रा. करसेंदा, थाना - पिपरी, जि. कौसंबी, राज्य - उत्तर प्रदेश

सदरचा गुन्हा नवी मुंबईचे पोलीस आयुक्त, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय मोहिते यांच्या आदेश व सुचनांप्रमाणे पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.अमित काळे व सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे, श्री.विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचा गुन्हा कक्ष ३ चे वपोनि विश्वनाथ कोळेकर व सपोनि सागर पवार, सपोनि ईशान खरोटे, पोउपनिरी सुशिल मोरे, सपोउपनिरी सचिन सुभे, पोहवा/९७४ प्रकाश मोरे, पोहवा/८५ प्रविण बावा, पोहवा/१२५६ कृष्णा मोरे, मपोहवा/५६ अनिता पवार, पोहवा/१८०६ सुधीर पाटील, पोहवा/२०१६ महेंद्र पाटील, पोहवा/२०९१ चेतन जेजूरकर, पोहवा/२०८७ सचिन धनवटे, पोहवा/२२४१ किशोर बोरसे, पोहवा/२३८६ दिनेश

जोशी, पोना/२८३६ राजेश मोरे, पोना/६०३ तुकाराम सोनवलकर यांनी गुन्हयाचे तपासकामी महत्त्वपुर्ण कामगिरी करुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास पनवेल शहर पोलीस ठाणेचे तपास पथक करीत आहे.

## आरोपींची नावे व पुर्वइतिहास :-

| अ.क्र | आरोपीचे नाव व वय | व्यवसाय | पत्ता | गुन्हे |
|---|---|---|---|---|
| १) | दिनेशकुमार भैय्यालाल सरोज वय १९ वर्षे, | समर्थ इंटरप्रायझेस, उसर्ली गाव येथील बेकरी मध्ये सुमारे ४ वर्षापासुन कामास | सध्या रा. समर्थ इंटरप्रायझेस, उसर्ली गाव, ता. पनवेल, जि. रायगड, मुळ रा. मोईनुद्दीनपूर, जि. कौसंबी, राज्य - उत्तर प्रदेश | वडील खुनाच्या गुन्हयामध्ये अटकेत होते अशी माहिती प्राप्त झाली आहे. |
| २) | वीरेंद्रकुमार रामदुलारे सरोज वय २१ वर्षे, | समर्थ इंटरप्रायझेस, उसर्ली गाव येथील बेकरी मध्ये सुमारे दिड वर्षापासुन कामास | सध्या रा. समर्थ इंटरप्रायझेस, उसर्ली गाव, ता. पनवेल, जि. रायगड, मुळ रा. जवाई, पो. सराय आखीत, थाना - मंझनपूर, जि. कौसंबी, राज्य उत्तरप्रदेश | -- |
| ३) | चंद्रशेखरकुमार लालजी वय २२ वर्षे, | समर्थ इंटरप्रायझेस, उसर्ली गाव येथील बेकरी मध्ये सुमारे दिड वर्षापासुन कामास | सध्या रा. समर्थ इंटरप्रायझेस, उसर्ली गाव, ता. पनवेल, जि. रायगड, मुळ रा. करसेंदा, थाना - पिपरी, जि. कौसंबी, राज्य - उत्तर प्रदेश | -- |

# पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्रं. २१५/२०२३, भा.द.वि.सं. कलम ३०२ प्रमाणे दाखल गुन्हयाचा कक्ष ३ गुन्हे शाखेने केलेला समांतर तपास

१. सदर घटनेची माहिति प्राप्त झालेनंतर कक्ष-०३, गुन्हे शाखेकडून तात्काळ घटनास्थळी भेट देवून अज्ञात आरोपींचा शोध घेणेबाबत समांतर तपास सुरु करण्यात आला होता.
२. कक्ष ३ चे तपास पथकाने फिर्यादी व सुमारे १५ ते २० साक्षीदार, घटनास्थळ परिसरामध्ये मिळून आलेल्या संशयित वस्तू, सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास, गोपनिय बातमीदार यांचे सहाय्याने आरोपींची माहिती मिळविण्याचे प्रयत्न सुरु केले होते.
३. मयताचे हत्येचे कारण तसेच आरोपींबाबत कोणतीही उपयुक्त माहिती मिळून येत नसल्याने कक्ष-०३ चे तपास पथकाने दिवसरात्र वारंवार घटनास्थळ परिसर पिंजून काढून परिसरातील येण्या-जाण्याचे मार्ग व पाऊलवाटांची माहिती घेवून, स्थानिक रहिवासी यांचेकडे माहिती घेवून तपास सुरू होता.
४. सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान शिवकर गावामध्ये चोरी करण्यासाठी काही आरोपी आलेले असल्याचे व त्यांनी काही रहिवाशांच्या घराला बाहेरून कडी लावलेली असले बाबत माहिती प्राप्त झालेली होती.
५. गुन्हयातील फिर्यादी यांचे घरातुन मोबाईल चोरी/गहाळ झाल असले बाबत देखील माहिती प्राप्त झालेली होती.
६. नमुद आरोपीत हे शिवकर गावामध्ये चोरी करण्यासाठी आलेले होते त्यावेळी त्यांनी काही रहिवाशांच्या घराला बाहेरून कडी लावलेली होती. त्यानंतर त्यांनी फिर्यादी व मयत यांचे घरातुन मोबाईल व इतर साहित्य चोरी करून जात असताना मयत याला नमुद आरोपीत चोरी करून जात असल्याचे जाणवले असता त्याने त्यांचा पाठलाग करून करीत असताना आरोपींनी त्याला चाकु व कु-हाडीने गंभीर दुखापती करत मुंबई पुणे एक्सप्रेसवे ब्रिजचे खाली रोडलगत झुडपामध्ये ओढत नेवुन जिवे ठार मारून टाकले असले बाबत प्राथमिक तपासामध्ये दिसुन आलेले आहे.
७. सदर गुन्हयाचे तांत्रिक तपासाच्या व गोपनीय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे अत्यंत कौशल्यपुर्ण व सखोल पद्धतीने विचारपूस तंत्राचा परिपुर्ण वापर करुन संशयित इसमांचा तपास सुरु होता.
८. सदर गुन्हयाच्या तांत्रीक तपासामध्ये (डम्पडाटा) मध्ये सुमारे दिड लाख मोबाईल नंबरच्या हालचाली दिसुन आल्या होत्या त्याबाबत सखोल सखोल तपास करून सुमारे १५० संशयीत मोबाईल क्रमांक धारकांची माहिति घेवुन पडताळणी केलेली होती.
९. दरम्यान अंतिम टप्यामध्ये सुमारे १५ मोबाईल धारकांना पडताळले असता ३ संशईत इसमांकडील अत्यंत कौशल्यपुर्ण व सखोल पद्धतीने विचारपूस तंत्राचा परिपुर्ण वापर करुन चौकशी केली असता वरील नमुद ३ आरोपींनी गुन्हयाची कबुली दिलेली आहे.
१०. नमुद आरोपीत यांना दिनांक ०६/०४/२०२३ रोजी पर्यत पोलीस कोठडी मंजुर असुन अधिक तपास पनवेल शहर पोलीस ठाण्याचे तपास पथक करीत आहे.
११. सदर गुन्हयातील आरोपींचा शोध घेवुन त्यांना शिताफिने ताब्यात घेणेकरीता कक्ष ३ चे वपोनि विश्वनाथ कोळेकर व सपोनि सागर पवार, सपोनि ईशान खरोटे, पोउपनिरी सुशिल मोरे, सपोउपनिरी सचिन सुभे, पोहवा/९७४ प्रकाश मोरे, पोहवा/८५ प्रविण बावा, पोहवा/१२५६ कृष्णा मोरे, मपोहवा/५६ अनिता पवार, पोहवा/१८०६ सुधीर पाटील, पोहवा/२०१६ महेंद्र पाटील, पोहवा/२०९१ चेतन जेजूरकर, पोहवा/२०८७ सचिन धनवटे, पोहवा/२२४१ किशोर बोरसे, पोहवा/२३८६ दिनेश जोशी, पोना/२८३६ राजेश मोरे, पोना/६०३ तुकाराम सोनवलकर यांनी महत्वाची कामगीरी बजावलेली आहे.